महाराष्ट्र टाइम्स
मुंबई टाइम्स सह
नोंदणी क्र. एमएच/एमआर/साऊथ-९३/२०१२-१४. आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ९२४९/६२.
s.com
मुंबई, शनिवार, २ फेब्रुवारी २०१३

उसळल्यानंतर केंद्र सरकारने न्या. जे.एस. वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून महिलांवरील अत्याचारांविरोधातील कायदे कडक करण्याबाबत सूचना करण्यास सांगितले होते. समितीने सूचना केल्या मात्र, खुनी बलात्काऱ्यास फाशीची सजा असावी, अशी शिफारस त्यांच्यात नव्हती. त्यामुळे त्या सूचनांच्या पलिकडे जात सरकारने अशा शिक्षेची तरतूद करण्याचे ठरवले असून महिलांवरील अत्याचार करणाऱ्यांना जरब बसण्यासाठी हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे.

याबाबत खास बोलावण्यात आलेल्या, केंद्रीय मंत्रिमंडळाच्या दोन तास चाललेल्या बैठकीत असा वटहुकूम काढण्यास मंजुरी देण्यात आली. हा वटहुकूम जारी करण्यासाठी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्याकडे पाठवण्यात येईल. संसदेचे बजेट अधिवेशन येत्या २१ फेब्रुवारीपासून सुरू होत असून, महिलांवरील अत्याचारांच्या मुद्द्यावर तातडीने पावले उचलली आहेत, हे तेथे सिद्ध करण्यासाठी हा वटहुकूम मंजूर केल्याचे सरकारला दाखविता येणार आहे.

या वटहुकुमाद्वारे गुन्हेगारी कायदा, भारतीय दंड संहिता (आयपीसी) आणि फौजदारी दंड संहिता (सीआरपीसी) व पुरावा कायद्यात (एव्हिडन्स ॲक्ट) बदल करण्यात येतील.

### काय आहेत दुरुस्त्या?

- 'बलात्कार' शब्दाची व्याख्या विस्तारित, आता 'लैंगिक हल्ला' मानणार.
- या गुन्ह्यासाठी पूर्वी जास्तीत जास्त सात वर्षे तुरुंगवासाची शिक्षा होती. आता ती जन्मठेपेपर्यंत जाईल.
- बलात्कारासाठी २० वर्षे तुरुंगवास; सामूहिक बलात्कार असेल तर आजन्म (मरेपर्यंत) कारावास.
- ॲसिड हल्ला हा वेगळा गुन्हा मानणार; आरोप सिद्ध झाल्यास कमीत कमी दहा वर्षे कारावास; प्रसंगी जन्मठेपही.
- विनयभंगासाठी दोन ते पाच वर्षे कारावास.
- अश्लील हावभावाच्या गुन्ह्यासाठी सध्याच्या एक वर्षावरून तीन वर्षे कारावास.

आणि नादलाच अधिकारीही उपस्थित होते. विशेष म्हणजे, परडमधील बस्ट कडड बाय आणि बस्ट कडड गेल हेहा महाराष्ट्राचेच ठरेल.

## रखडलेल्या प्रकल्पाला सुप्रीम कोर्टाचा हिरवा कंदील

# माथेरानला जाऊया... रोप-वेने!



म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई



डोंगरातील पाऊलवाटांनी मार्ग काढत तर, कधी रस्त्याने ट्रेकिंग करत... कधी मिनी ट्रेनच्या सफरीची मजा लुटत तर कधी भाड्याच्या मोटारीने वळणावळणांचा प्रवास करत... माथेरानला जाण्यासाठी हे मार्ग आपल्यापैकी अनेकांनी कधीनाकधी अवलंबिले असतीलच. आता त्यात रोप-वेचीही भर पडणार असून सुप्रीम कोर्टाने त्यास हिरवा कंदील दिला आहे.

माथेरानसाठी रोप-वे करण्याची योजना विनयचंद कोठारी यांनी २००१ मध्ये आणली. त्यासाठी माथेरान रोप-वे प्रा.लि. या कंपनीची स्थापनाही करण्यात आली. पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक असलेला हा प्रकल्प या पर्यटनस्थळाच्या वैभवातही भर घालणारा असल्याने माथेरानच्या नगरपालिकेसह स्वयंसेवी व व्यावसायिक संघटनांनी प्रकल्पाला एकमुखी पाठिंबा जाहीर केला होता. मात्र, त्याचवेळी माथेरान पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र जाहीर करण्याच्या हालचाली सुरू होऊन तो प्रकल्प अडकला.

या संदर्भात सेंट्रल एम्पॉवर्ड कमिटीकडे अनेक सुनावण्या झाल्या. प्रकरण सुप्रीम कोर्टाकडे गेले आणि आता रोप-वेला हिरवा कंदील मिळाला आहे. त्यामुळे विकासक म्हणून मे. माथेरान रोप-वे प्रा.लि. कंपनीच्या नावाची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असून दोन वर्षात प्रकल्प पूर्ण करण्याचे बंधन घालण्यात आले आहे. वन विभागाच्या मंजुरीनंतर त्याच्या कामाला सुरुवात होणार असल्याचे बोलले जात आहे.

### भुतिवली ते माथेरान

- कर्जत-नेरळ मार्गावरील भुतिवली ते माथेरान असा हा रोप-वे होणार असून त्याची लांबी ४९०० मीटर तर उंची ७५० मीटर असणार आहे.
- रोप-वेने तासाला किमान ४०० प्रवाशांची वाहतूक होणार असून प्रतिसेकंद पाच मीटर या वेगाने ती होईल. रोप-वेमध्ये प्रवासी तसेच मालवाहतुकीचीही सुविधा असेल.